# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.12.2024** **वार– गुरुवार**

---

**विलिनीकरण**

पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंटचे पुणे महापालिकेत विलीनीकरण करण्यासाठी तांत्रिक मुद्द्यांवर संरक्षण विभागाबरोबर चर्चा करण्यात आली आहे. विलिनीकरणासंदर्भातील मार्गदर्शक सूचना त्यांच्याकडून महापालिकेला दिल्या जाणार आहेत. त्यानुसार प्रस्ताव करून राज्य शासनाकडे पाठवला जाईल. केंद्र आणि राज्य शासन अंतिम निर्णय घेणार आहे, असं पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितलं. पुणे शहरातील पुणे कॅन्टोन्मेंट आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे पुणे महापालिकेत विलिनीकरणासंदर्भात गेल्या वर्षभरापासून चर्चा सुरु आहे. यासंदर्भात मंगळवारी लष्कराच्या दक्षिण मुख्यालयात उच्चस्तरीय बैठक झाली. त्यासंदर्भात आयुक्त भोसले यांनी माहिती दिली.

**पुणे मनपा**

सिंहगड रस्त्यावरील एकतानगरीमध्ये निळ्या रेषेच्या आतील बांधकामांचं पुनर्वसन करण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार विठ्ठलवाडी इथल्या नियोजित सिंहगड रस्ता पोलिस ठाण्याच्या मागच्या बाजूला महापालिकेच्या जागेवर पुनर्वसन केलं जाणार आहे. त्यासाठीचा प्रस्ताव पुणे महापालिकेने राज्य शासनाकडे पाठवला असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली. पुणे शहर आणि खडकवासला धरण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे 25 जुलै रोजी मुठा नदीला पूर आला होता. त्यामध्ये एकतानगर भागातील अनेक सोसायट्या, दुकानांमध्ये पाणी शिरून कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालं होतं. या घटनेनंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांनी पुराचा धोका टाळण्यासाठी नागरिकांचे कायम स्वरूपी पुनर्वसनासाठी विशेष दर्जा देऊन क्लस्टर केलं जाईल असं सांगितलं होतं.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने सक्षम उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम अवयव आणि साहित्य वाटप आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आलं. शिबिरात 264 विद्यार्थ्यांना 577

साधनांचं वाटप करण्यात आलं. यामध्ये व्हील चेअर, ब्रेल कीट, श्रवनयंत्र, टीएलएम कीट, रोलेटर, सीपी चेअर, वॉकर, प्रोग्रामेबल स्मार्ट फोन, स्मार्ट केन कॅलिपर या साहित्य साधनांचा समावेश होता.

**Pcmc2**

केंद्रीय नागरी सेवेतील सनदी अधिकारी प्रशिक्षणार्थींनी नुकतीच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांना भेट दिली. औंध ते वाकड फाट्यादरम्यान रस्त्याच्या दुतर्फा केलेलं सुशोभिकरण, पिंपळे सौदागरचं लिनीअर गार्डन, मोरवाडी इथलं दिव्यांग भवन, निगडी इथल्या इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर आदी विकासकामं आणि प्रकल्पांना प्रशिक्षणार्थींनी भेट दिली. या सर्व प्रकल्पांची माहिती प्रत्यक्षस्थळी आणि संगणकीय सादरीकरणाद्वारे संबंधित विभागप्रमुखांनी दिली.

**पुणे जिल्हा परिषद**

पुणे जिल्हा परिषदेने मुलींना स्वसंरक्षण करता यावं, यासाठी ज्युदो कराटे आणि शारीरिक विकासाच्या संदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी योजना आखली आहे. जिल्ह्यातील अडीच हजार मुलींना ज्युदो-कराटे आणि सुमारे 27 हजार मुलींना शारीरिक विकासाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे, अशी माहिती पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी दिली. दोन्ही प्रशिक्षणांसाठी खासगी संस्थांची नेमणूक केली असून, त्यासाठी जिल्हा परिषदेने सुमारे जवळपास 50 लाख रुपये खर्च केले आहेत.

**वाहतूक बदल**

पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर इथं दत्तजयंती निमित्त मिरवणूक सोहळा साजरा होत असल्याने सासवड ते कापूरहोळ रस्त्यावरील अवजड वाहतूक 13 डिसेंबर रोजी रात्री 11 वाजल्यापासून 15 डिसेंबर रोजी संध्याकाळी 6 वाजेपर्यंत पर्यायी रस्त्यावरुन वळवण्याचे आदेश पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मीडिया मॅजिक इन्स्टिटयूट संयुक्तपणे 'विज्ञान चित्रपट निर्मिती प्रकल्प राबवणार आहेत. हा प्रकल्प येत्या 14 डिसेंबरपासून 5 जानेवारीपर्यंत प्रत्येक शनिवारी आणि रविवारी प्रत्येकी दोन तास असेल. इयत्ता 6 वी ते 12 वी च्या विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी होता येईल. http://sciencepark.unipune.ac.in/ या संकेतस्थळावर अधिक महिती उपलब्ध आहे.

**कॉंग्रेस**

आगामी काळात निवडणुका मतपत्रिकांवर घ्याव्यात, या मागणीसाठी शहर काँग्रेसच्या वतीने स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नवी पेठेत ही स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.

**सिंहगड**

पुण्याजवळील सिंहगडावर उद्यापासून तीन दिवस एवरेस्टींग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. एवरेस्ट पर्वताइतकी उंची सर करण्याच्या हेतूनं कमाल सोळा तर किमान आठ भागांमध्ये स्पर्धकांना सिंहगड सर करावा लागणार आहे. घाटरस्त्यानं धावणं आणि चालणं अशा स्वरुपात दोन पर्याय असून 14 डिसेंबर पौर्णिमेच्या रात्री स्पर्धक गडावर जातील.

**थॅलेसेमिया**

रोटरी क्लब हडपसर सेन्ट्रलच्या वतीने थॅलेसेमिया ग्रस्त बालकांसाठी रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात 94 नागरिकांनी सहभाग घेतला यात महिलांची संख्या ही लक्षणीय होती.

**कैदी पलायन**

येरवड्यातील खुल्या कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा सुनावलेला कैदी पसार झाल्याची घटना उघडकीला आली आहे. याप्रकरणी संबंधित कैद्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल पटोनिया असं कैद्याचं नाव आहे. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात त्याला जन्मठेपेची शिक्षा, तसंच 15 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या हवामान कोरडं असेल, कमाल तापमान 31 तर किमान तापमान 13 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**